# मेट्रो-३चे भुयारीकरण पूर्ण

## मुंबई सेंट्रल येथे अखेरचे खनन

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

मुंबईला उत्तर-दक्षिण जोडणाऱ्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाने बुधवारी भुयारीकरण १०० टक्के पूर्ण केले. मुंबई सेंट्रल स्थानकाजवळील हा बोगदा पूर्ण करून मैलाचा दगड गाठला गेला.

मेट्रो-३ हा प्रकल्प मुंबईला पश्चिमेकडून उत्तर ते दक्षिण जोडतो. उत्तरेला सीप्झ-आरे तर दक्षिणेला कफ परेडपर्यंत हा मार्ग असेल. या मार्गाचा पहिला टप्पा डिसेंबर २०२३मध्ये सुरू होणार आहे. तर दुसरा टप्पा डिसेंबर २०२४पर्यंत सुरू करण्याचे नियोजन आहे. या दुसऱ्या टप्प्यातील मुंबई सेंट्रल स्थानकातील ४२वा बोगदा बुधवारी पूर्ण करण्यात आला.

हा प्रकल्प मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड ही विशेष उपक्रम कंपनी पूर्ण करीत आहे. कंपनीनुसार, मुंबई सेंट्रल स्थानकाजवळील हा बोगदा अपलाइन मार्गावरील होता. तो पूर्ण केल्याने या मार्गावर एकूण ५४.५ किलोमीटरचे भुयारीकरण पूर्ण झाले असून, त्यासाठी एकूण ४३ दिवसांचा कालावधी लागला. यामध्ये ५५८ कॉंक्रीट रिंग्सचा वापर करण्यात आला. मेट्रो-३ मार्गातील सर्वांत लांब पट्ट्यांपैकी एक असलेल्या पॅकेज-३मध्ये मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, विज्ञान संग्रहालय, आचार्य अत्रे चौक आणि वरळी, या मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. पॅकेज-३अंतर्गत महालक्ष्मी मेट्रो स्थानक ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकापर्यंतचे ८३७ मीटरचे भुयारीकरण सर्वाधिक आव्हानात्मक होते. ते काम 'तानसा-१' नाव असलेल्या 'टीबीएम' यंत्राने यशस्वीरित्या पूर्ण केले. कामगारांच्या सुरक्षिततेशी तडजोड न करता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरत करीत हे काम पूर्ण झाल्याचा विश्वास मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे संचालक (प्रकल्प) एस. के. गुप्ता यांनी व्यक्त केला.



> "मेट्रो-३चा संपूर्ण मार्ग हा मुंबईच्या ऐतिहासिक वारसा इमारती, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती, रेल्वे मार्ग, सध्याचा मेट्रो मार्ग, नदी व कठीण भौगोलिक रचना असलेला परिसर आदींच्या खालून व अगदी जवळून जातो. त्यामुळेच या मार्गाचे भुयारीकरण पूर्ण करणे आव्हानात्मक होते. ते यशस्वी पूर्ण झाल्याबद्दल संपूर्ण चमूचे अभिनंदन!
>
> – अश्विनी भिडे, व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड